# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २४ मार्च, २०२५ / चैत्र ३, १९४७ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) महसूल मंत्री**<br>**(२) वने मंत्री**<br>**(३) आदिवासी विकास मंत्री**<br>**(४) कृषी मंत्री**<br>**(५) सामाजिक न्याय मंत्री**<br>**(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री**<br>**(७) मदत व पुनर्वसन मंत्री**<br>**(८) मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २३**

---

### छत्रपती संभाजीनगर शहरातील सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारित असलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याबाबत

**(१) * ५९८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर शहरातील सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत असलेल्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे जेवण व अपुऱ्या सोई-सुविधा दिल्या जात असल्याने तेथे राहणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याची बाब दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतिगृहाची दुरुस्ती केली नसल्याने छताचा काही भाग निखळला असून सदर सहा मजली वसतिगृहाच्या इमारतीमध्ये विद्यार्थ्यांसाठी बसविण्यात आलेली सर्व उद्वाहने बंद स्थितीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, छत्रपती संभाजीनगर शहरातील सदर वसतिगृहामध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे जेवण व अपुऱ्या सोई-सुविधा पुरविणारे तसेच वसतिगृहाच्या दुरावस्थेबद्दल जबाबदार असलेल्या संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेवर शासनामार्फत कोणती कारवाई केली तसेच वसतिगृहाच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

१००० मुलांचे शासकीय वसतिगृह युनिट क्र.१, किलेअर्क, छत्रपती संभाजीनगर या वसतिगृह इमारतीच्या छताचा भाग निखळलेला नसून इमारतीच्या छताचा गिलावा कमकुवत झाल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी छताचा गिलावा काढुन टाकण्यात आला आहे. तसेच, युनिट क्र.१, २ व ३ मधील बंद असलेल्या उद्वाहनापैकी (लिफ्ट) युनिट क्र. १ येथील उद्वाहन दुरुस्त करण्यात आले असून ते सद्य:स्थितीत कार्यान्वित आहे. तसेच, युनिट क्र.२ व ३ मधील उद्वाहनाच्या दुरुस्तीचे काम सुरु आहे.

(३) सदर प्रकरणी आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्यास्तरावर चौकशी करण्यात आली असून संबंधित वसतिगृहाचे गृहप्रमुख/ गृहपाल यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आलेली आहे. सदर वसतिगृहाच्या साफसफाईसाठी नियुक्त करण्यात आलेल्या कंपनीस रुपये १,५०,०००/- इतका दंड आकारण्यात आला आहे. तसेच, १००० मुलांचे शासकीय वसतिगृह, किलेअर्क, छत्रपती संभाजीनगर येथील इमारत दुरुस्तीसाठी रुपये ४,९९,९९,८४८/- इतक्या रकमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास शासन ज्ञापन, दिनांक ८ जानेवारी, २०२५ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय वाढविण्याकरीता उपाययोजना करणेबाबत

**(२) * २१० डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील १३३ मत्स्यव्यवसाय संस्था बंद पडण्याच्या स्थितीत असल्याने सदर मत्स्यव्यवसायावर अवलंबून असलेल्या लाखो कुटुंबियांवर उपासमारीची वेळ येऊन त्यांना रोजगारासाठी गावोगावी भटकावे लागत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोंदिया जिल्ह्यातील मत्स्योत्पादन प्रोत्साहनपर अनुदान देण्याबाबत तसेच मत्स्यव्यवसाय वाढविण्याच्या दृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे :** (१) हे खरे नाही.

(२) मत्स्यव्यवसाय विभागाकडील ६४ तलाव शासन निर्णय दिनांक ०३/०७/२०१९ मधील धोरणानुसार मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना मासेमारीसाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. गोंदिया जिल्ह्यातील एकूण १४४ मालगुजारी तलाव, जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडून मत्स्यपालन सहकारी संस्थेस प्राधान्याने मासेमारीसाठी ठेक्याने देण्यात आलेली आहेत.

गोंदिया जिल्ह्यात बांध पध्दतीद्वारे पावसाळ्यात मत्स्यप्रजनन करुन मत्स्यबीज निर्मिती करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी सन २०२२-२३ मध्ये बांध प्रजननासाठी उपयोगी असणारे साहित्याचा पुरवठा ९ संस्थांना मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत रुपये ८.९७ लक्ष खर्च करुन लाभ देण्यात आला होता.

तसेच जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना मासेमारीसाठी आवश्यक असणारे मासेमारी जाळे व नौका अनुदानावर खरेदीसाठी मासेमारी साधनांच्या खरेदीवर अर्थसहाय्य योजनेंतर्गत ५०% अनुदानाने स्वस्त दरात उपलब्ध करुन देण्यासाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात सर्वसाधारण योजनेंतर्गत रुपये २१ लक्ष ची तरतूद जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत अर्थसंकल्पित असून त्याचा लाभ गोंदिया जिल्ह्यातील मच्छिमारांना होणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे प्राणी संग्रहालय (गोरेवाडा) नागपूर येथील प्राण्यांना "बर्ड फ्ल्यू" ची लागण झाल्याबाबत

**(३) * २८४ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे प्राणी संग्रहालयातील (गोरेवाडा) नागपूर येथील तीन वाघ व एका बिबट्याचा "बर्ड फ्ल्यू" या रोगाची लागण होऊन मृत्यू झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा अहवाल सेमिनरी हिल (नागपूर) येथील वन्यप्राणी उपचार केंद्रांकडून प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राणी संग्रहालयातील अन्य प्राण्यांना उपरोक्त विषाणूची लागण होऊ नये याकरीता शासनामार्फत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) व (२) गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालय, नागपूर येथे दिनांक २०/१२/२०२४ रोजी १ बिबट व २ वाघांचा तसेच दिनांक २३/१२/२०२४ रोजी १ वाघाचा मृत्यू राष्ट्रीय उच्च सुरक्षा पशुरोग संस्था, भोपाळ यांचेकडून प्राप्त अहवालानुसार एच-५ एन-१ या विषाणुमुळे झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालय येथे वन्यप्राण्यांचा विषाणुजन्य आजारामुळे मृत्य होऊ नये म्हणून प्रशासनामार्फत खालीलप्रमाणे उपायोजना करण्यात आल्या आहेत.

- बाधित प्राण्यांचे पिंजरे निर्जंतुक करण्यात आले आहेत.
- प्रचलित नियमांतील तरतुदीनुसार मृत प्राण्यांचे मृतदेह नष्ट करण्यात आले आहेत.
- सर्व कर्मचाऱ्यांना पी.पी.ई. किट उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.
- सदर क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना अन्य क्षेत्रात जाण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.
- सर्व कर्मचारी व प्राण्यांच्या नमुने तपासणीसाठी राष्ट्रीय उच्च सुरक्षा पशुरोग संस्था, भोपाळ येथे पाठवून धोका नसल्याची खात्री करण्यात आली आहे.
- संभाव्य धोका टाळण्यासाठी कोंबडीच्या मांसाचा पुरवठा बंद करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बाळापुर (जि.अकोला) शहरालगतच्या शासकीय जमिनीवर विनापरवाना विटभट्ट्या उभारण्यात आल्याबाबत

**(४) * ४७ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळापुर (जि.अकोला) शहरालगत असलेल्या शासकीय गायरान, ई-क्लास, एफ क्लास सारख्या शासकीय जमिनीवर वीट उत्पादकांनी सपाटीकरण व अतिक्रमण करुन तसेच राष्ट्रीय हरित लवादाच्या (एनजीटी) आदेशाचे उल्लंघन करुन विनापरवाना विटभट्ट्या उभारल्याने मागील १७ वर्षांपासून शासनाचा कोटयवधी रुपयांचा महसूल बुडत असल्याची तसेच परिसरातील वातावरण प्रदूषित होऊन पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत महसूल अधिकारी व प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी तसेच तालुका प्रशासकीय अधिकारी/ कर्मचारी यांचेकडून कोणतीही दंडात्मक कारवाई करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर वीट उत्पादकांवर तसेच संबंधित दोषी शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच वीट उत्पादकांकडून बुडीत महसूल वसूल करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशत: खरे आहे.

बाळापूर शहराच्या लगत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळांनी परवानगी दिलेल्या व पारंपारिक विटभट्ट्या ह्या खाजगी जमीन व काही पारंपारिक विटभट्ट्या शासकीय जमिनीवर असल्याचे दिसून येते. या विटभट्ट्यांना लागणारी माती ही स्वामित्वधन चा भरणा करुन आणि मंजूर खनिपट्टा मधून उचल होत असल्याने शासनाची महसूल वसुली होते. जर अवैध मातीची वाहतूक केली तर दंडात्मक कारवाई करण्यात येते. यावर्षी ४ प्रकरणात एकूण ५,०६,०००/- रुपये इतका दंड वसूल करण्यात आला आहे. सदर विटभट्ट्या या पारंपारिक लहान विटभट्ट्या असून त्यापासून पर्यावरणास हानिकारक प्रदूषण झालेले दिसून येत नाही. तसेच गायरान व ई-क्लास जमिनीवरील नवीन विटभट्टीचे अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत नगरपरिषद व संबंधित ग्रामपंचायत यांना कारवाईचे पत्र तहसिलदार, बाळापूर यांच्यामार्फत देण्यात आले आहे. तसेच जुन्या पारंपारिक विटभट्ट्यांची निस्तार पत्रकात नोंद घेणे बाबत जिल्हाधिकारी, अकोला यांचे पत्र क्र. कक्ष-८/प्र.स/कावि १९४५/२०२३ दिनांक १०/०७/२०२३ नुसार तपासणी सुरु आहे.

तसेच बाळापूर, जि.अकोला येथे पारंपारिक विटभट्ट्या असून त्यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संमतीपत्र प्रदान करण्यात येत नाही. पर्यावरण, वन व जलवायू परिवर्तन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक २२/०२/२०२२ रोजीच्या अधिसूचनेत नमूद नियमानुसार चिमणी असलेल्या विटभट्ट्यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संमतीपत्र प्रदान करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

याबाबत अवैध विटभट्टीसाठी माती वाहतूक करणाऱ्या ४ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये एकूण रुपये ५,०६,०००/- एवढी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(३) अवैध माती वाहतूक केल्यास विटभट्टी धारकाकडून यावर्षी सुमारे ४ प्रकरणात रुपये ५,०६,०००/- एवढी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच स्वामित्वधन रक्कम रुपये रुपये ३०,४८,०००/- तसेच अकृषक कर रुपये १,८४,२८४/- वसूल करण्यात आला आहे व आवश्यक भूभाडे भरुन घेण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## क्रांतिवीर लहूजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या शिफारशींबाबत

**(५) * ७४२ श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) क्रांतिवीर लहूजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाने मातंग व तत्सम जाती समूहाचा सखोल व सर्वकष अभ्यास करून ८२ शिफारशींसह सादर केलेल्या अहवालातील ६८ शिफारशींना शासनाने तत्वतः मान्यता दिली असून, त्यानुषंगाने सामाजिक न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सीबीसी-१०/२००८/ प्र.क्र.५२२/ मावक, दिनांक ३१ डिसेंबर, २०११ या शासन निर्णयातील शिफारशींपैकी अनु.क्र. ५४ वरील शिफारस क्र. ८० नुसार आयोग दर दहा वर्षांनी पुनर्स्थापित करण्याबाबतची शिफारस होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, क्रांतिवीर लहूजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या पुनर्गठनाबाबत तसेच नव्याने कार्यरत करावयाच्या योजनांबाबत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असलेल्या एकूण २९ आरक्षण विषयक व आर्थिक भाराच्या शिफारशींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच विलंबासाठी जबाबदार असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मातंग व तत्सम जातीसंदर्भात क्रांतिवीर लहूजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाने शिफारस केलेल्या ८२ शिफारशींपैकी ६८ शिफारशींना शासन निर्णय, दिनांक ३१/१२/२०११ तत्वतः शासन मान्यता दिली आहे. शासन निर्णय, दिनांक ३१/१२/२०११ अन्वये तत्वत: मान्य शिफारशींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत सर्व मंत्रालयीन विभाग तसेच क्षेत्रिय कार्यालयांना वेळोवेळी कळविण्यात आले आहे.

नव्याने कार्यरत करावयाच्या योजनांसंदर्भातील २९ शिफारशींबाबत शासन स्तरावर वेळोवेळी आढावा बैठका घेवून संबंधित विभागांना आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत वेळोवेळी कळविण्यात आले आहे.

राज्यात अनुसूचित जाती प्रवर्गाकरीता लागू असलेल्या केंद्र/ राज्य शासनाच्या सर्व योजनांचा लाभ या प्रवर्गामध्ये समाविष्ट असलेल्या सर्व जातींना दिला जातो.

तसेच क्रांतिवीर लहूजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या तत्वत: मान्य केलेल्या आर्थिक भाराच्या शिफारशींसंदर्भात संबंधित विभागांना तसेच साहित्यरत्न लोक शाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळास प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत सूचित केले आहे.

मातंग समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक तसेच कल्याणकारी योजनांसंदर्भात अंमलबजावणीकरीता साहित्यरत्न लोक शाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ कार्यरत आहे. सदर महामंडळाकडून केंद्र/ राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ मातंग समाजातील व्यक्तींना देण्याबाबत कार्यवाही केली जाते. शासन निर्णय, दिनांक ३१/१२/२०११ अन्वये तत्वत: मान्य केलेल्या शिफारशीं विविध विभागांशी संबंधित असून, त्याबाबतची कार्यवाही संबंधित विभागांकडून करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोयना खोऱ्यातील झाडाणी (ता.महाबळेश्वर, जि.सातारा) गावातील संवेदनशील भागातील जमीन खरेदी प्रकरणाबाबत

**(६) * १११७ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोयना खोऱ्यातील झाडाणी (ता.महाबळेश्वर, जि.सातारा) गावात उच्चपदस्थ शासकीय अधिकाऱ्यांसह तेरा जणांनी तब्बल ६२० एकर शेतजमीन अत्यल्प दरात खरेदी करुन वृक्षतोड करून पक्क्या स्वरूपाचे बांधकाम केल्याचे तसेच सातारा, रायगड, पुणे, ठाणे, नंदुरबार येथेही जमीन खरेदी केली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमीन खरेदी गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी अप्पर जिल्हाधिकारी, सातारा यांची समिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सातारा जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना नोटीस बजावून खरेदी करण्यात आलेली अतिरिक्त जमीन शासन जमा करण्यात यावी असा अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने सातारा, रायगड, पुणे, ठाणे आणि नंदुरबार जिल्ह्यांमध्ये जमीन खरेदी गैरव्यवहार प्रकरणी संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर जमिनीत कोठेही वृक्षतोड झालेली दिसून येत नाही. तसेच अनधिकृत बांधकामबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत संबंधितांना नोटीस बजावण्यात आलेली असून त्याबाबतची कार्यवाही महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडाळाच्या स्तरावरून सुरू आहे.
(२), (३) व (४) महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ च्या तरतूदीनुसार सिलिंग मर्यादेपेक्षा अधिकची जमीन धारणा केली आहे किंवा कसे याबाबत तपासणी करण्याकरीता अपर जिल्हाधिकारी, पुणे, अपर जिल्हाधिकारी, रायगड व अपर जिल्हाधिकारी, नंदुरबार यांची चौकशी अधिकारी म्हणून दिनांक १३/०१/२०२५ रोजीच्या शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आली आहे. अहवालातील निष्कर्षाअंती कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बार्टी संस्थेच्या माध्यमातून अनुसूचित जातीच्या उमेदवारांना आर्थिक सहाय्य देण्यासाठीच्या निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(७) * १२५६ श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बार्टी संस्थेच्या माध्यमातून शासनाने समाजातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा देण्याकरीता कल्याणकारी योजना सुरू करण्यात आली असून त्याकरीता अनुदान देण्यासाठी काही विशिष्ट क्लासेसची निवड करण्यात आली असून संस्थेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सहाय्याने क्लास चालक विद्यार्थ्यांना ज्ञानदान न करता आर्थिक लाभ मिळवित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थेद्वारे राबविण्यात येणाऱ्या निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार होत असून, अधिकाऱ्यांशी संगनमत करून निविदा मिळविल्या जात असून याबाबत विद्यार्थ्यांनी विरोध दर्शविल्यास त्यांच्यावर दबाव टाकून धमकावले जात आहे तसेच सदर प्रक्रियेमध्ये शासनाच्या जवळपास २०० कोटी पेक्षा अधिक रक्कम अधिकारी, क्लास चालक आणि विद्यार्थ्यांमध्ये संगनमताने वाटली जात असल्यामुळे खरे लाभार्थी वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त गैरव्यवहार प्रकरणातील संबंधित अधिकाऱ्यांवर व क्लास चालक यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच संबंधित विद्यार्थ्यांना त्यांच्या इच्छेनुसार क्लास निवडता यावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) हे खरे नाही.

बार्टीमार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीचे संशोधन, शासकीय योजनांचे मूल्यमापन व विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येते यामध्ये प्रामुख्याने संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा परीक्षा, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, राज्यसेवा परीक्षा, बँक, रेल्वे एल.आय.सी. व इतर तत्सम परीक्षा, पोलीस व मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षण तसेच कौशल्य विकासाबाबत विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतात. सन २०२४-२५ मध्ये आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीद्वारे विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी प्रशिक्षण संस्था निवड करण्याकरीता ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

विभागाच्या दिनांक ३०/१०/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये, राज्यातील टीआरटीआय, बार्टी, महाज्योती, अमृत व इतर तत्सम स्वायत्त संस्थामार्फत कार्यान्वित असलेल्या अथवा करण्यात येणाऱ्या छात्रवृत्ती, प्रशिक्षण, कौशल्य विकास व अन्य कार्यक्रमामध्ये आवश्यक समानता आणण्याकरीता सर्वंकष धोरण निश्चित करण्यात आले आहे. या अंतर्गत राज्यातील टीआरटीआय, बार्टी, महाज्योती, अमृत इत्यादी संस्थाकडून राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाचे अंमलबजावणी व सनियंत्रण करण्यासाठी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीद्वारे विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी

प्रशिक्षण संस्था निवड करण्याकरीता ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. ई-निविदा प्रक्रियेद्वारे गुणवत्तापूर्ण अशा १७६ क्लासेसची निवड करण्यात आली असून विद्यार्थ्यांना सदर क्लासेसमधून त्यांच्या पसंतीप्रमाणे क्लास निवडण्याची मुभा देण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

विद्यार्थी निवड करण्याकरीता विद्यार्थ्यांची सामायिक चाळणी परीक्षा घेण्यात आली व बार्टी अंतर्गत असलेल्या आरक्षणानुसार दिनांक २१/०९/२०२४ रोजी बार्टी मार्फत विद्यार्थ्यांची निवड व प्रतीक्षा यादी प्रसिध्द करण्यात आली. ऑनलाईन पोर्टल मार्फत विद्यार्थ्यांना पसंतीची प्रशिक्षण संस्था निवडण्याची मुभा देण्यात आली असून डिसेंबर, २०२४ पासून प्रशिक्षण सुरु करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथील वन्य प्राण्यांना दत्तक घेण्याच्या योजनेच्या कराराचे नुतनीकरण करण्याबाबत

**(८) * १४०० श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय उद्यानात पिंजरा बंद प्राण्यांच्या संवर्धनासाठी सन २०१४ मध्ये वन्यजीव दत्तक योजना सुरु केली असून, या योजनेंतर्गत सफारी, बचाव केंद्र, आणि दर्शन पिंजऱ्यांमध्ये असलेले वाघ, बिबट्या, सिंह, वाघाटी, निलगाय आणि हरीण यांसारख्या प्राण्यांना दत्तक घेण्याचे आवाहन केले जात असून यामध्ये प्राण्यांचा वर्षभराचा आहार आणि उपचाराचा खर्च दत्तक पालकांना करावा लागतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्षभरासाठी दत्तक घेतलेल्या प्राण्यांच्या खर्चाची रक्कम योजनेनुसार वाघासाठी ०३ लाख १० हजार रुपये, सिंहासाठी ०३ लाख रुपये, बिबट्यासाठी ०१ लाख २० हजार रुपये, वाघाटीसाठी ५० हजार रुपये, निलगायीसाठी ३० हजार रुपये आणि हरिणासाठी २० हजार रुपये इतका खर्च अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात सध्या ०८ वाघ, २० बिबट्या, ०२ वाघाटी आणि ०१ नीलगाय यांचे पालकत्व स्विकारण्यात आले असून ०२ वाघ आणि ०१ बिबट्या अजूनही पालकत्वाच्या प्रतीक्षेत असून दत्तक करार संपुष्टात आल्यानंतरही अद्याप नूतनीकरण करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दत्तक योजनेमार्फत पालकत्व कराराचे नुतनीकरण करण्यासंदर्भात तसेच वन्य प्राण्यांना आहार देणे व त्यांचे संवर्धन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) व (२) हे खरे आहे.

महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक : डब्ल्युएलपी १०.१०/प्र. क्र. ८१/फ-१, दिनांक २६/१२/२०२३ अन्वये वन्यप्राणी दत्तक योजना राबविण्यात येत असून त्याकरीता खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे दत्तक शुल्क आकारण्यात येते.

| अ. क्र. | वन्यप्राण्यांचे नाव | दत्तक शुल्क / प्रती वर्ष (रुपये ) |
|---|---|---|
| १ | सिंह (Lion) | ३००००००/- |
| २ | वाघ (Tiger) | ३१००००/- |
| ३ | बिबट (Leopard) | १२००००/- |
| ४ | वाघाटी (Rusty Spotted Cat) | ५००००/- |
| ५ | निलगाय (Bluebull) | ३००००/- |
| ६ | चितळ | २००००/- |

(३) हे खरे नाही.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथे सद्य:स्थितीत बंदीस्त असलेले वन्यप्राणी दत्तक योजनेंतर्गत दत्तक घेण्यासाठी सिंह-४, वाघ-८, बिबट-१२, वाघाटी-२ निलगाय-१ असे एकूण ३६ वन्यप्राणी उपलब्ध असून सदर ३६ वन्यप्राणी १७ व्यक्ती व ८ संस्थांमार्फत दत्तक घेण्यात आले आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तूर पिकाला भाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याबाबत

**(९) * १६३१ श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तूर हे खरिप हंगामील एक प्रमुख डाळवर्गीय पीक असून नागपूर व इतर जिल्ह्यामध्ये गतवर्षी झालेल्या कमी पावसामुळे बुरशीजन्य रोग व मर रोगांचा प्रादुर्भाव होऊन तूर पिवळी पडल्यामुळे तसेच धुक्याच्या परिणामामुळे तूर उत्पादन घटल्याने तसेच तुरीचा भावही कमी झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तूर पिकाचे उत्पादन वाढून शेतकऱ्यांना चांगला बाजारभाव मिळावा तसेच बुरशी व मर रोगामुळे पिकाचे झालेल्या नुकसानाची भरपाई मिळण्याच्यादृष्टीने शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) राज्यात तूर पिकावर बुरशीजन्य व मर रोगाचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव दिसून आलेला होता. यासंदर्भात एस.एम.एस., गावबैठका, घडीपत्रिका, माहितीपत्रिका, शेतीशाळा, वर्तमान पत्रातील बातम्या या माध्यमांव्दारे शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली आहे. तसेच, आर्थिक नुकसान पातळीच्या वर नुकसान झालेल्या गावांमध्ये कृषी विद्यापीठातील शास्त्रज्ञांसोबत भेटी देऊन शेतकऱ्यांना उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहेत.

(२) केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयामार्फत, राज्यातील एकूण उत्पादन क्षेत्र व उत्पादकता यांच्या आधारे हमीभाव घोषित करण्यात येतात.

हंगाम २०२४-२०२५ मध्ये केंद्रशासनाने किमान आधारभूत योजनेंतर्गत तूर पिकासाठी रुपये ७५५०/- प्रति क्विंटल प्रमाणे हमीभाव जाहीर केलेला आहे. त्यानुसार दिनांक २४/०१/२०२५ पासून राज्यात तूर खरेदीसाठी शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी व दिनांक १३/०२/२०२५ पासून खरेदी सुरू करण्यात आली आहे.

राज्यात तूर खरेदीसाठी नाफेडद्वारे ४११ व एनसीसीएफद्वारे १४८ अशी एकूण ५५९ खरेदी केंद्र कार्यान्वित करण्यात आली आहेत.

दिनांक ०४/०३/२०२५ अखेर राज्यात ३९,९१२ शेतकऱ्यांची नोंदणी झाली असून ९१२ शेतकऱ्यांकडून ९६९० क्विंटल तूर खरेदी करण्यात आली असून खरेदी प्रक्रिया सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कालावल-हडी-तोंडवळी (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) येथील गड नदीच्या पात्रातून अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याबाबत

**(१०) * १६३६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कालावल-हडी-तोंडवळी (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) येथील गड नदीच्या पात्रातून सन २०२० पासून अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याची तक्रार तोंडवळी गावातील ग्रामस्थांकडून तहसिलदार, मालवण यांचेकडे वारंवार करूनही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास तोंडवळी (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) येथील ग्रामस्थांनी अवैध वाळू उपसा रोखण्याकरीता माहे जानेवारी, २०२५ मध्ये महिला आंदोलकांनी गड नदीच्या पात्रात उतरून साखळी उपोषण सुरु करूनही तहसिलदार, मालवण यांनी कोणतीही दखल घेतली नसल्याचे तसेच आंदोलन करणाऱ्या ग्रामस्थांना जमावबंदी जारी करुन पोलिसांनी नोटीसा पाठविल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अवैध वाळू उपसामुळे गावातील नदीलगतच्या जमिनीचा भाग खचल्याने ग्रामस्थांच्या घरांना तडे गेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गड नदीतून केल्या जाणाऱ्या वाळूच्या उपसाबाबत मेरी टाईम बोर्ड यांनी शासनास अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अवैध वाळू उपसा रोखण्याकरीता कोणती कार्यवाही केली तसेच अवैध वाळू उपसा कारणाऱ्यांवर व ग्रामस्थांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित तहसिलदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) हे खरे नाही.

कालावल खाडीतील तोंडवळी हडी येथे वाळू उत्खनन होऊ नये याबाबत तोंडवळ ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयास तक्रार केली आहे.

तोंडवळ ग्रामस्थांनी तक्रार केलेल्या क्षेत्रामध्ये वाळू उत्खनन करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत परवाने देण्यात आलेले होते. ग्रामस्थांनी तक्रार केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कालावल खाडी पात्रातील शेलटी ते हडी मुख्य गट-B, उपगट. B-३ या गटाचे पुनःश्च जलआलेखन, सर्वेक्षण व सिमांकन दिनांक २०/०१/२०२५ रोजी करणेत आलेले आहे. सदर सर्वेक्षण व सिमांकन वेळी उपोषणकर्ते यांचे प्रतिनीधी उपस्थित होते.

तसेच तोंडवळी ग्रामस्थांची तक्रार प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग कार्यालयाकडून बी-३ या हातपाटी गटामधून वाळू उत्खनन व वाहतूक करणेसाठी कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यात आलेली नाही.

दिनांक १३/०१/२०२४ रोजी ग्रामस्थांनी केलेल्या उपोषणासंदर्भात जमावबंदी आदेश जारी केले नसून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये या करीता भारतीय नागरी सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६८ प्रमाणे नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

(३) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(४) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) अशी बाब नाही.

-----------------

## मंठा (जि.जालना) मंडळ अतिवृष्टी अनुदानातून वगळल्याबाबत

**(११) * १६९० श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंठा (जि.जालना) तालुक्यात माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये अतिवृष्टी होऊन शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याने मंठा तालुका व मंठा मंडळातील अनेक गावांना भेटी देऊन पंचनामे करण्यात आले असून झालेल्या नुकसानीसंदर्भात मदत करण्याचे शासनाकडून आश्वासित करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून नुकसानग्रस्तांची यादी जाहीर करण्यात आली असून जालना जिल्ह्यातील मंठा मंडळाचा सदर यादीत समावेश न केल्याने माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान तहसिलदार, मंठा यांना नुकसानग्रस्तांच्या यादीत समावेश करण्याबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करून मंठा मंडळाचा नुकसानग्रस्तांच्या अधिकृत यादीत समावेश करून मंठा तालुक्यातील शेतकऱ्यांना अनुदान मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) :** (१), (२) व (३) सप्टेंबर, २०२४ या कालावधीमध्ये मंठा तालुक्यातील मंठा महसूल मंडळामध्ये जास्तीत जास्त ५४.३ मि.मी. पावसाची नोंद झालेली आहे. शासन निर्णयानुसार ज्या महसूल मंडळामध्ये २४ तासात ६५ मि.मी. पेक्षा जास्त पावसाची नोंद झालेली आहे, त्या महसूल

मंडळात अतिवृष्टी झाली असे संबोधले जाते. तथापि, मंठा महसूल मंडळामध्ये दिनांक ०१/०९/२०२४ ते दिनांक ३०/०९/२०२४ या कालावधीमध्ये झालेल्या कोणत्याही एका दिवसामध्ये पावसाची नोंद ६५ मि.मी. पेक्षा कमी असल्याने अतिवृष्टी या घटकामध्ये समाविष्ट होत नाही. अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत शासन निर्णय क्रमांक सीएलएस २०२३/प्र.क्र.२८६/म-३, दिनांक १० डिसेंबर, २०२४ अन्वये जालना जिल्ह्यासाठी रुपये ४१२३०.९३ लक्ष रुपये इतका निधी वितरीत करण्यास शासनाने मंजूरी दिली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यात शासकीय बांधकामासाठी वापरल्या जाणाऱ्या गौण खनिजावर रॉयल्टी भरणा केला नसल्याबाबत

**(१२) * १७६४ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यातील शासकीय बांधकामांसाठी वापरल्या जाणाऱ्या गौण खनिजावर रॉयल्टी निश्चित करून त्याचा भरणा खनिकर्म विभागाकडे करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची असूनही विविध विभागांनी रॉयल्टी कपात करूनही भरणा केली नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने विविध विभागांनी रॉयल्टी कपात करून ती भरणा केली नसल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) यवतमाळ जिल्ह्यातील विविध शासकीय बांधकामावर वापरल्या जाणाऱ्या गौण खनिजावरील स्वामित्वधनाची दिनांक ०६/०३/२०२५ रोजीपर्यंत रुपये ०५,५४,५९,२९२/- इतकी रक्कम शासन जमा करण्यात आलेली आहे.

तर बेंबळा प्रकल्प विभाग, यवतमाळ यांचेकडे निधी उपलब्ध नसल्याने गौण खनिज स्वामित्वधनाची रक्कम जमा झालेली नाही.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम अदा करणेबाबत

**(१३) * २०११ डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील पाचही तालुक्यात सन २०२४ मधील खरीप पीक हंगामात अतिवृष्टी होऊन शेत पिकांचे नुकसान होऊन जमिनीवरचे थरही वाहून गेल्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला असून, गत पाच महिन्यांचा कालावधी होऊनही अद्याप शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पंतप्रधान खरीप पीक योजनेंतर्गत १ रुपयांमध्ये विम्याची नोंद करुन ८ महिने उलटूनही विमा कंपनीने अद्यापपर्यंत कोणतीही रक्कम शेतकऱ्यांना अदा केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शेतकऱ्यांना पीक विम्याची प्रलंबित रक्कम विनाविलंब मिळण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच विमा अदा करण्यास विलंब करणाऱ्या विमा कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१), (२) व (३) खरीप हंगाम, २०२४ मध्ये हिंगोली जिल्ह्यात शेतकऱ्यांनी एकूण ४,७८,४८६ अर्जाव्दारे पिकविमा योजनेत सहभाग घेऊन ३,१८,४७२ हेक्टर क्षेत्रावरील पिके विमा संरक्षित केली आहेत.

खरीप हंगाम, २०२४ मध्ये हिंगोली जिल्ह्यात विविध जोखीम बाबींकरीता दिनांक ०३/०३/२०२५ अखेर रुपये २६.६९ कोटी अंतरिम नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे.

विमा कंपनीस प्रलंबित राज्य हिस्सा विमा हप्ता अनुदान वितरणाची कार्यवाही राज्यस्तरावर प्रगतीत आहे. सदर निधी राज्य शासनाकडून विमा कंपनीस वितरित झाल्यानंतर, त्वरित शेतकऱ्यांना विमा कंपनीमार्फत नुकसान भरपाई अदा करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कृषी महाविद्यालय, नागपूर येथील विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा पुरविण्याबाबत

**(१४) * २०६५ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरीता आवश्यक सोयी सुविधांचा अभाव, निष्कृष्ट भोजन, अस्वच्छता असून निवासाची योग्य व्यवस्था नसल्याने येथील विद्यार्थ्यांना एका हॉलमध्ये भर थंडीत जमिनीवर झोपावे लागत असल्याचे तसेच तेथील कर्मचाऱ्यांची उध्दट वर्तणूक सहन करावी लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने यासंदर्भात माहिती घेवून येथील विद्यार्थ्यांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे नाही.

(२) डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत कृषी महाविद्यालय, नागपूर येथे पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी एकूण ३ इमारतींमध्ये २३४ खोल्यांचे वेगवेगळे वसतिगृह असून, यामध्ये एकूण ५०८ विद्यार्थी वास्तव्यास आहेत. त्याचप्रमाणे पदवी व पदव्युत्तर विद्यार्थीनींसाठी ११३ खोल्यांचे वेगवेगळे वसतिगृह बांधण्यात आलेले असून, यामध्ये एकूण ४४८ विद्यार्थीनी वास्तव्यास आहेत.

विद्यार्थी व विद्यार्थिनी वसतिगृहाचा परिसर सर्व बाजूंनी मोठ्या पक्क्या भिंतींनी बंधिस्त करण्यात आलेला आहे. विद्यार्थी व विद्यार्थिनी वसतिगृहामध्ये भोजनालयाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

नागपूर, कृषी महाविद्यालयातील वसतिगृहांच्या स्वच्छतेसाठी कंत्राटी पुरुष व महिला सफाई कामगारांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांच्या वसतिगृहात कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची वेळोवेळी विद्यार्थ्यांसोबतच्या वागणूकीबाबत नियमितपणे शहानिशा करण्यात येते. तसेच, वसतिगृहात विद्यार्थ्यांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सामाजिक आणि बहुजन क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देण्याबाबत

**(१५)** * **२११० श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्यावतीने सामाजिक आणि बहुजन क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तींना दिले जाणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार, संत रोहिदास पुरस्कार व कर्मवीर पद्मभूषण दादासाहेब गायकवाड पुरस्कार मागील ४ वर्षांपासून वितरित करण्यात आले नसल्याचे दिनांक २ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुरस्कारांचे वितरण करण्यासाठी अनेक सामाजिक संघटनांनी वेळोवेळी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने प्रलंबित असलेले पुरस्कार तातडीने वितरित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) हे खरे नाही.

सन २०१९-२० ते २०२२-२३ या चार वर्षातील एकूण ३९३ व्यक्ती/ संस्थांची निवड करुन दिनांक १२/०३/२०२४ रोजी मुंबई येथे पुरस्काराचे वितरण करण्यात आले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बेला (ता.उमरेड, जि.नागपूर) येथील वडगाव जलाशयात परप्रांतियांकडून मासेमारी करण्यात येत असल्याबाबत

**(१६)** * **२०३ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेला (ता.उमरेड, जि.नागपूर) येथे हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या वडगाव जलाशयात परप्रांतीय मच्छिमारांना शासनाने मासेमारी करण्यासाठी मज्जाव केला असतानाही शासकीय आदेशाचे उल्लंघन करून परप्रांतीय मच्छिमार मासेमारी करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त संदर्भात झालेल्या तक्रारीनंतर पोलीस विभागाने मत्स्य विभागास आपला अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालानुसार संबंधित दोषी परप्रांतीय मच्छिमारांवर तसेच परप्रांतीय मच्छिमारांना मच्छीमारीकरीता मज्जाव करण्याबाबतच्या आदेशाची योग्य ती अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे :** (१) व (२) बेला (ता.उमरेड, जि.नागपूर) येथील वडगाव जलाशय (२२४२ हेक्टर) जीवन विकास मच्छीमार सहकारी संस्था मर्यादीत बेला, ता.उमरेड, जि.नागपूर संस्थेस मासेमारीकरीता दिनांक ०१/०७/२०२४ ते दिनांक ३०/०६/२०२९ पर्यंत मासेमारीकरीता ठेक्याने देण्यात आलेला आहे.

सदर जलाशयावर बाहेरील राज्यातील मच्छीमारांकडून मासेमारी सुरु असल्याबाबत एकात्मिक मत्स्योत्पादन विकास सहकारी संस्था मर्या. किन्हाळगांव रिधोरा या संस्थेने सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन बेला, नागपूर ग्रामीण यांना कार्यवाही करणेबाबत विनंती केली. पोलीस विभागाने केलेल्या पाहणी दरम्यान २ परप्रांतीय मच्छिमार आढळून आल्याचे पोलीस विभागाने सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय नागपूर यांना कळविले.
(३) पोलीस विभागाकडून प्राप्त पत्राच्या अनुषंगाने क्षेत्रिय कार्यालयाकडून दिनांक ०९/०१/२०२५ रोजी मौका पंचनामा करण्यात आला. तथापि, यावेळी, वडगांव जलाशयात परप्रांतीय मासेमार मासेमारी करताना आढळून आलेले नाहीत. तरीही प्रस्तुत प्रकरणी संबंधित जलाशयावर विनापरवाना परप्रांतीय, मासेमारी करतात किंवा कसे याची पुनश्च तपासणी करावी व विनापरवाना परप्रांतीय मासेमारी करत असल्यास शासन नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करावी, असे निर्देश आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचेकडून क्षेत्रिय कार्यालयास देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देण्यासाठीच्या निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१७) * १२५७ श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून शासनाने अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना न्याय देण्याच्या उद्देशाने तसेच स्पर्धा परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या युवक युवतींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध कल्याणकारी योजना सुरू केल्या असून विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य (स्टायफंड) देण्यासाठी काही

विशिष्ट क्लासेसची निवड करण्यात आली आहे तसेच सदर संस्थेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सहाय्याने क्लास चालक विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याऐवजी आर्थिक व्यवहार करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्थेद्वारे राबविण्यात येणाऱ्या निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार होत असून, अधिकाऱ्यांशी संगनमत करून टेंडर मिळवले जात आहे तसेच विद्यार्थ्यांनी या गैरव्यवहाराविरोधात आवाज उठविल्यास त्यांच्यावर दबाव टाकून धमकाविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाची जवळपास २०० कोटी रुपयांहून अधिक रक्कम अधिकारी, क्लास चालक व विद्यार्थ्यांच्या संगनमताने वाटली जात असल्यामुळे खरे लाभार्थी आर्थिक सहाय्यापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने सदर प्रक्रियेला स्थगिती देऊन उपरोक्त प्रकरणी होणाऱ्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या इच्छेनुसार क्लास निवड करता यावी याबाबत कोणती कार्यवाही केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) विद्यार्थ्यांना प्रशिक्षण कालावधीत विद्यावेतन व अनुषांगिक लाभाची रक्कम थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे अदा करण्यात येते.
(४) विद्यार्थ्यांना त्यांच्या इच्छेनुसार क्लासची निवड करता यावी यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेमार्फत विकल्प पोर्टल विकसित करण्यात आले असून विद्यार्थ्यांनी या पोर्टलद्वारे प्रशिक्षण संस्थांची निवड केलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तिरोडा (जि.गोंदिया) तालुक्यातील मजुरांना रोजगार हमी योजनेंतर्गतची मजूरी मिळण्याबाबत

**(१८) * १४७४ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामीण भागातील नागरिकांना रोजगार उपलब्ध केला जात असून तिरोडा (जि.गोंदिया) तालुक्यात अनेक गावांमध्ये सामाजिक वनीकरण अंतर्गत रोपवन आणि रोपवाटीकाच्या कामात ४०० मजुरांकडून झाडे लावून त्याचे संगोपन करण्याचे काम सुरू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या मजुरांचे माहे ऑक्टोबर, २०२४ पासून ते आजपर्यंत जवळपास २५ लाख रुपये मजुरीची रक्कम बँक खात्यात जमा न झाल्याने त्यांचेवर उपासमारीची वेळ आली असून मजुरांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त योजनेंतर्गत मजूरांना प्रलंबित मजुरी लवकर मिळण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) हे अंशत: खरे आहे.

रोपवने व रोपवाटीकेच्या कामावर दिनांक ०५/०३/२०२५ रोजी १८७ मजूरांची उपस्थिती होती.
(२) हे खरे नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काम करण्याऱ्या मजूरांची १०० दिवसांपर्यंतची मजूरी केंद्र शासन अदा करते. ही मजूरी माहे डिसेंबर, २०२४ अखेर केंद्र शासनाकडून मजूरांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. १०० दिवसांवरील मजूरी राज्य शासनाकडून देण्यात येते. या प्रलंबित मजूरीपैकी गोंदिया जिल्ह्यातील तसेच तिरोडा तालुक्यातील माहे ऑक्टोबर, २०२४ पासून अद्यापपर्यंत १०० दिवसांवरील प्रलंबित मजूरीपैकी १० फेब्रुवारी, २०२५ पर्यंतची मजूरी अदा करण्यात आलेली आहे.
(३) १०० दिवसांपर्यंत प्रलंबित मजूरी वितरणासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कृषी साहित्य खरेदीच्या धोरणात बदल केल्याबाबत

**(१९) * २०३२ श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कृषी साहित्य खरेदीकरीता दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी सुरू करण्यात आलेली थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) योजना सन २०२३ मध्ये तत्कालीन कृषी मंत्री यांनी बंद करून विभागामार्फत कृषी साहित्य खरेदी करण्याचा निर्णय घेतल्याने बाजारमुल्यापेक्षा जास्त किंमतीत कृषी साहित्य खरेदी झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये किंवा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी डीबीटी योजना बंद करून जास्त किंमतीत कृषी साहित्य खरेदी करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) व (२) कापूस सोयाबीन पिकांची उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास कार्यक्रमांतर्गत सन २०२३-२४ साठी नॅनो युरिया, नॅनो डिएपी, मेटाल्डीहाईड, बॅटरी संचलित फवारणी पंप व कापूस साठवणूक बॅग या निविष्ठा शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यासाठी या निविष्ठांचे दर हे महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांच्यास्तरावर विहित निविदा प्रक्रिया राबवून निश्चित करण्यात आले होते. तसेच, कापूस साठवणूक बॅगबाबत महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ यांच्या स्तरावरुन दर निश्चित करण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील ग्रामिण भागात नियमबाह्य पध्दतीने मुरूम उत्खनन होत असल्याबाबत

**(२०) * २१३३ श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील दवल मेटी, लावा, खडगाव, सुराबर्डी, दुग्धमना इ. गावांसह ग्रामीण भागात नियमबाह्य पध्दतीने मुरूम उत्खनन व क्रशरच्या माध्यमातून जमिनीतून अनेक वर्षांपासून उत्खनन केले जात असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांमध्ये उत्खननासाठी स्फोटके वापरण्यात येत असल्याने अनेक घरांना तडे जात असून तसेच उत्खननामुळे धूळ उडून शेतीचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी होत असलेले उत्खनन रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) नागपूर जिल्ह्यातील तहसिल कार्यालय, नागपूर ग्रामीण अंतर्गत गावात उत्खननासाठी स्फोटके वापरल्याने घरांना तडे गेल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तसेच, उत्खननामुळे धूळ उडून शेतीचे नुकसान झाल्याचे आढळून आलेले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि, नागपूर ग्रामिण तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक रोखण्याकरीता एकूण चार ठिकाणी चेक पोस्ट उभारण्यात आले असून, सदर चेक पोस्टवर अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## मेळघाटातील धारणी आणि चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील मजुरांची थकीत मजूरी अदा करण्याबाबत

**(२१) * २१४३ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाटातील धारणी आणि चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील सुमारे ७० हजार मजूरांचे रोजगार हमी योजनेच्या कामांचे ४० कोटी रुपयांची मजूरी मागील ३ महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे तसेच रोहयोच्या कामाची मजूरी न मिळाल्याने झालेल्या कर्जामुळे गंगाखेडा येथील एका मजुराने गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याचे दिनांक ५ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अमरावतीसह राज्यातील विविध भागातील रोजगार हमी योजनेतील मजुरांची थकीत मजूरी अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) हे अंशत: खरे आहे.

गागंरखेडा येथील आत्महत्या केलेल्या मजुरांबाबत पोलीस पंचनामा अहवालानुसार सदर मजुराने मजूरी न मिळाल्यामुळे आत्महत्या केलेली नाही. सदर मजुराची मजूरी रुपये ३७७५ प्रलंबित आहे.

सद्य:स्थितीत मग्रारोहयोअंर्तगत करण्यात आलेल्या कामांसंदर्भात चिखलदरा व धारणी तालुक्यातील जि.अमरावती १०० दिवसाखालील दिनांक ३१/१२/२०२४ पर्यंतची मजूरी प्रदान करण्यात आली आहे. तसेच अमरावती जिल्ह्यातील १०० दिवसावरील मजूरी दिनांक ०८/१२/२०२४ पर्यंतची मजूरी प्रदान करण्यात आली आहे.

(२) आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये राज्यातील मनरेगाअंर्तगत करण्यात आलेल्या कामांच्या मजूरीवर झालेल्या खर्चाच्या अनुषंगाने सदर १०० दिवसाखालील मजूरी निधीमागणी करीता केंद्र शासनाकडे वेळोवेळी संपर्क व आवश्यक तो पाठपुरावा करण्यात येत आहे. आणि १०० दिवसावरील मजूरीच्या प्रदानासाठी वित्त विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## तिरोडा (जि.गोंदिया) तालुक्यातील अवैधरित्या वाळूचे उत्खनन व वाहतूकीवर कारवाई होत नसल्याबाबत

**(२२) * १२६८ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिरोडा (जि.गोंदिया) तालुक्यात मोठ्या प्रमाणात वाळूचे उत्खनन व वाहतूक होत असल्याबाबतच्या अनेक तक्रारी नागरिकांनी तिरोडा महसूल विभागाकडे केल्या असून महसूल विभाग याकडे दुर्लक्ष करित असल्याने नागरिकांच्या तक्रारीवरून गोंदिया जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांनी रात्री अचानक छापे टाकून कारवाई केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तिरोडा तालुक्यातील वैनगंगा नदीवरील कोणत्याही वाळू घाटाचा लिलाव करण्यात आलेला नसला तरीही अवैधरित्या वाळूचे उत्खनन व वाहतूक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तिरोडा तालुक्यात होत असलेल्या अवैधरित्या वाळूचे उत्खनन व वाहतूक रोखण्याकरीता तसेच दोषी अधिकारी/ कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मौजे बिरोली येथील नागरिकांनी वाळू चोरीला आळा घालण्यासाठी व नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलीस चौकी बसवून देण्याबाबत तहसिलदार, तिरोडा यांना निवेदन दिले होते. त्यानुषंगाने तहसिलदार, तिरोडा यांनी सदर ठिकाणी पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, तिरोडा यांना कळविण्यात आले असता सदर ठिकाणी भरारी व बैठे पथक उभारण्यात आले आहे.

दिनांक ११/०१/२०२५ रोजी जिल्हाधिकारी, गोंदिया, पोलीस अधीक्षक, गोंदिया, तहसिलदार, तिरोडा व पोलीस निरीक्षक, तिरोडा यांनी केलेल्या संयुक्त दौऱ्यावेळी मौजे घोगरा येथील तीन गौण खनिज विक्रेता लायसन्स धारक यांची अंदाजे ५८०० ब्रास वाळूसाठा जप्त केला असून, त्याची मोजणी करण्यासाठी उप संचालक, भुविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांना कळविण्यात आले आहे. सदर परिसरात उभे असलेले ७ पोकलँड मशिन व ४ रिकामे टिप्पर जप्त करून संबंधितावर गुन्हे दाखल करण्यात आले व त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करून रुपये ८ लाख वसूल करण्यात आले आहे.

(२) शासन निर्णय दिनांक १६/०२/२०२४ च्या तरतुदीनुसार सन २०२४-२०२५ करीता दिनांक ३०/०१/२०२५ अखेर गोंदिया जिल्ह्यातील वाळूघाट व वाळू डेपो लिलावात गेलेले नाहीत. तिरोडा तालुक्यातील माहे एप्रिल, २०२४ ते जानेवारी, २०२५ अखेरपर्यंत रेती या गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणामध्ये कार्यवाही करून रुपये २२.९२ लक्ष दंड वसूल केला आहे.

(३) गोंदिया जिल्ह्यातील गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणांवर आळा घालण्याकरीता जिल्ह्यात क्षेत्रिय स्तरावर भरारी पथके नियुक्त करण्यात आले असून, तालुकास्तरीय पथकाव्दारे वेळोवेळी तपासणी करण्यात येत आहे. त्यामुळे अवैधरित्या वाळूचे उत्खनन व वाहतूक रोखण्याकरीता दोषी अधिकारी/ कर्मचारी यांचेवर कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोरा ते मुंबईतील भाऊचा धक्का आणि करंजा ते रेवस या दोन्ही जेट्टीचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२३)** * **१४७८ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील जलमार्ग उरणला जोडण्यासाठी सन २०१८ मध्ये मंजूर झालेल्या मोरा ते मुंबईतील भाऊचा धक्का आणि करंजा ते रेवस या दोन्ही रो-रो सेवांसाठी १०५ कोटी रुपये मंजूर झाले असून त्यात मोरा जेट्टीसाठी ७५ कोटी रुपये आणि करंजा-रेवससाठी २५ कोटी रुपये निधी मंजूर असल्याचे दिनांक २ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रो-रो सेवेच्या कामामध्ये दिरंगाई झाल्याने ३० कोटी रुपयांच्या निधीची वाढ करण्यात आली असून याबाबत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी प्रस्ताव सादर करूनही आजमितीस रेवस जेट्टीचे काम पूर्ण झाले नसून अपूर्णावस्थेत असल्याबाबत समर्थन संस्थेने मा.मत्स्यव्यवसाय मंत्री व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना दिनांक २९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील जलमार्ग उरणला जोडून तसेच दोन्ही तालुक्यातील ५० किमी अंतर कमी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे :** (१) अंतर्गत जलवाहतुकीस चालना देण्याच्या दृष्टीकोनातून रायगड जिल्ह्यातील अलिबाग व उरण तालुका जलमार्गाने जोडण्याकरीता महाराष्ट्र सागरी मंडळामार्फत मोरा व रेवस येथे रो रो जेट्टी व तत्सम सुविधा निर्माण करण्याच्या अनुषंगाने मोरा रो रो जेट्टीसाठी रुपये ८८.७२ कोटी व रेवस रो रो

जेट्टीसाठी रुपये २५.०७ कोटी इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास सन २०२२ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२) होय.

(३) व (४) करंजा (उरण) येथील रो रो जेट्टीचे काम पूर्ण झाले असून मोरा रो रो जेट्टी व रेवस (अलिबाग) रो रो जेट्टीचे काम कार्यवाहीखाली आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१)(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.